# मेट्रो ३ मार्गिकेच्या आसपास वृक्षारोप ा कर याचे आवाहन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ भुयारी मेट्रो ३ मार्गिकेच्या परिसरात वृक्षारोपण करावे असे आवाहन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) नागरिकांना करण्यात आले आहे. नागरिकांनी लावलेल्या झाडांची देखभाल पुढील तीन वर्षांसाठी ठेकेदाराच्या माध्यमातून केली जाणार आहे.

मेट्रो ३ मार्गिकेच्या कामासाठी ३३.५ किमीच्या दरम्यान मोठ्या संख्येने झाडे कापण्यात आली आहेत. तर आरे कारशेडमधील झाडांची कत्तल हा तर मोठा वादाचा विषय ठरला आहे. एकूणच मेट्रो ३ मार्गिकेत करण्यात आलेल्या झाडांची कत्तल लक्षात घेता याचा मोबदला म्हणून मेट्रो ३ च्या मार्गिकेच्या परिसरात मोठ्या संख्येने झाडे लावण्याचा निर्णय एमएमआरसीने घेतला आहे. वृक्षारोपणासंबंधीचे प्रतिज्ञापत्र ही एमएमआरसीने उच्च न्यायालयात सादर केले आहे. त्यानुसार मेट्रो स्थानक परिसरात वृक्षारोपण केले जात आहे. तर आता एमएमआरसीने नागरिकांना ही वृक्षारोपणासाठी आवाहन केले

**वृक्षारोपण करण्यास इच्छुक नागरिकांकडून एमएमआरसीने १५ जुलैपर्यंत अर्ज मागविले आहेत.**



आहे. सरकारी, खासगी कार्यालये, निवासी संकुले, शैक्षणिक संस्था, रुग्णालये अशा आस्थापनांना एमएमआरसीने वृक्षारोपणासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे. वृक्षारोपणासाठीची झाडे आणि झाडांच्या लागवडीसाठी एमएमआरसीकडून मदत केली जाणार आहे. तर झाड लावल्या नंतर पुढील तीन वर्षे या झाडांच्या देखभालीची जबाबदारी एमएमआरसीच्या ठेकेदाराची असणार आहे. मेट्रो ३ मार्गिकेच्या आसपासच्या ५०० मीटरच्या परिसरात वृक्षारोपण करण्यास प्राधान्य असणार आहे. तेव्हा वृक्षारोपणासाठी इच्छुक असलेल्या नागरिक, गृहनिर्माण संस्था, इतर संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. http:// mmrcl. com/ en/ documents/5635/ public Notice या संकेतस्थळावर इच्छुकांना १५ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. उपक्रमासाठी एका नोडल अधिकाऱ्याची ही नियुक्ती करण्यात आली आहे. या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन एमएमआरसीने केले आहे.